# सोलापूर विद्यापीठ
**परीक्षा विभाग**
सोलापूर पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगाव,
सोलापूर - ४१३ २५५
ईपीएबीक्स - ०२१७ -२७४४७६०/६१/६३/६६/७१/७२/७३/७४/७८/७९
फॅक्स नं. - ०२१७-२७४४७७०
संकेतस्थळ: http://su.digitaluniversity.ac/www.sus.ac.in
ई-मेल: coe@sus.ac.in

NAAC Accredited-2015
'B' Grade (CGPA 2.62)

# Solapur University
**Examination Section**
Solapur-Pune National Highway, Kegaon,
Solapur-413 255
EPABX No.0217- 2744760/61/63/66/71/72/73/74/74/79
Fax No.0217-2744770
Web Site : http://su.digitaluniversity.ac/www.sus.ac.in
email id: coe@sus.ac.in


जा. क्र. सोविसो/परीक्षा/२०१६-१७/१८३३ दि. २७/०९/२०१६

प्रति,
**मा. प्राचार्य/मा. संचालक,**
सोलापूर विद्यापीठांशी संलग्नित सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था

**विषय** : जुन्या अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांनी नवीन अभ्यासक्रमाप्रमाणे समकक्ष विषयाची परीक्षा देण्याबाबत.

**महोदय,**

उपरोक्त विषयानुसार आपणास आदेशाद्वारे कळविण्यात येते की, प्रत्येक विद्याशाखेतील अभ्यासक्रम प्रति तीन वर्षाने किंवा त्याहून कमी कालावधीत ही सुधारित केली जातात. **प्रत्येक वर्गातील अभ्यासकम हा सुधारित झाल्यानंतर जुन्या अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना जुन्या अभ्यासक्रमानुसार दोन संधी उपलब्ध करून दिल्या जातात. यामध्येही विद्यार्थी अनुत्तीर्ण राहिल्यास त्यास नविन अभ्यासक्रमाप्रमाणे त्या त्या विषयाच्या समकक्ष विषयाची परीक्षा देणे अनिवार्य असते.** तसेच वार्षिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना सत्र पध्दतीनुसार दोन विषयाची परीक्षा देणे आवश्यक असते.

वरील बाबींच्या अनुषंगाने, बी.ए./बी.कॉम/बी.एस्सी. या अभ्यासक्रमाची माहे ऑक्टो/नोव्हें २०१६ ची सत्रनिहाय परीक्षा दि.१८/१०/२०१६ पासून सुरु होत आहे. आपल्या महाविद्यालयात २०१० व २०१३ पॅटर्नचे विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ठ होत असतील तर त्यांनी खालील नमूद केलेल्या तक्त्याप्रमाणे त्या त्या सत्रातील विषयाप्रमाणे समकक्ष परीक्षा देणे अनिवार्य आहे. याकरीता खालीलप्रमाणे स्पष्टीकरणार्थ तपशील असे.

| Class | Pattern | For which Pattern student have to be Appear | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Sem-I | Sem-II | Sem-III | Sem-IV | Sem-V | Sem-VI |
| B.A.B.Com B.Sc. | 2010 | 2014 CGPA | 2014 CGPA | 2013 CGPA | 2013 | 2013 | Chance is available as per 2010 Pattern For Sem -VI |
| | 2013 | 2014 CGPA | 2014 CGPA | 2014 CGPA | Chance is available as per 2013 Pattern for Sem - IV/V/VI | | |

| Class | Pattern | For which Pattern student have to be Appear | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | Sem-I | Sem-II | Sem-III | Sem-IV |
| M.A./M.Com | 2010/2013 | 2015 CBCS | 2013 | 2013 | 2013 |

वरीलप्रमाणे इतर अभ्यासक्रमाच्या जसे बी.बी.ए./बी.सी.ए./विधी/बी.फॉर्म/अभियांत्रिकी/एम.एस्सी/एम.सी.ए व उर्वरित सर्व अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना जुना अभ्यासक्रमाप्रमाणे दोन संधी संपल्यानंतर त्या त्या पॅटर्नप्रमाणे अस्तित्वात असलेल्या पॅटर्नमधील समकक्ष विषयांची परीक्षा देणे आवश्यक असेल याची नोंद घ्यावी. तसेच तांत्रिक अडचणीमुळे जुन्या अभ्यासक्रमातील ऑनलाईन या संगणकीय कार्यप्रणालीद्वारे तयार झालेल्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशपत्रावर जुन्या पॅटर्नच्या अभ्यासक्रमाप्रमाणे विषयाची नावे छापली गेलेली असून त्यासमोर परीक्षेचे दिनांक व वेळ छापली गेली नसल्यामुळे विद्यार्थ्यांनी त्या त्या पॅटर्नमधील समकक्ष विषयाच्या अभ्यासक्रमाप्रमाणे संकेतस्थळावर उपलब्ध असलेले वेळापत्रक पाहून संबधीत समकक्ष अभ्यासक्रमांची परीक्षा द्यावी.

**जुन्या अभ्यासक्रमातील प्रवेशपत्र वितरित करतेवेळी वरील बाब विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देवून त्यांना समकक्ष विषयाची संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या वेळापत्रकाप्रमाणे परीक्षा देण्याच्या सूचना द्याव्यात. तसेच २०१० व २०१३ व इतर जुन्या अभ्यासक्रमाच्या पॅटर्नमधील विद्यार्थ्यांना त्या त्या सत्र परीक्षेचे प्रश्नपत्रिकेचे वाटप ही वरीलप्रमाणेच किंवा समकक्ष विषयाप्रमाणे करावे.**

सदरील बाब ही विद्यार्थी, पालक, शिक्षक, वेळोवेळी नियुक्त केले जाणरे **अंतर्गत/बहिस्थ वरिष्ठ पर्यवेक्षक** व परीक्षेसी निगडीत सर्व घटकांच्याही निदर्शनास सत्वर आणावी.

आपला विश्वासू,

**(बी. पी. पाटील)**
परीक्षा नियंत्रक

**प्रत माहितीस्तव :**

१. परीक्षा विभागातील संबधीत विभाग
२. अभ्यासमंडळे विभागास योग्य त्या कार्यवाहीस्तव